खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

(सुवर्णमहोत्सवी वर्ष)

प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष : २०२६ -२०२७

भूगोल व मराठी विभाग : वनसचेतन शिबीर

सकाळ

भीमाशंकर (ता. खेड) : वनसचेतन शिबिरात सहभागी झालेले हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे विद्यार्थी.

वनसचेतन शिबिरातून जैवविविधतेची ओळख

'राजगुरू'च्या विद्यार्थ्यांची भोरगिरी ते भीमाशंकर जंगल भ्रमंती

राजगुरूनगर, ता. २३ : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील भूगोल व मराठी विभागाच्या वतीने भोरगिरी ते भीमाशंकर वनसचेतन शिबिराचे नुकतेच आयोजन केले होते. या शिबिरात ५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. जंगल भ्रमंतीदरम्यान विद्यार्थ्यांनी परिसरातील जैवविविधता, वनसंपदा आणि निसर्गसौंदर्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

भूगोल विभाग प्रमुख डॉ. दिलीप मुळूक व प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी विद्यार्थ्यांना विविध झाडे, वनस्पती, शेकरू आणि ब्ल्यू मॉरमॉनसह अनेक फुलपाखरांची ओळख करून दिली. प्रत्यक्ष निरीक्षणातून विद्यार्थ्यांना वनस्पती आणि प्राणिजीवनातील परस्परसंबंध समजावून सांगण्यात आले. या शिबिरामधून जैवविविधतेचे संवर्धन, जंगलाचे संरक्षण आणि निसर्गातील प्रत्येक घटकाचे महत्त्व याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण झाली.

भीमाशंकर परिसरात प्लॅस्टिक कचरा संकलित करणाऱ्या वनविभागातील महिला कर्मचाऱ्यांशी विद्यार्थ्यांनी संवाद साधला. या संवादातून पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि निसर्गरक्षणासाठी केले जाणारे प्रयत्न विद्यार्थ्यांना जवळून समजले.

निसर्ग घटकांचे प्रत्यक्ष निरीक्षण करून विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी जिज्ञासा निर्माण करणे आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव दृढ करणे, हा शिबिराचा प्रमुख उद्देश होता.

शिबिराचे आयोजन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, भूगोल विभागप्रमुख डॉ. दिलीप मुळूक, प्रा. मच्छिंद्र मुळूक आणि प्रा. वैभवी कोपर्डे यांनी केले.

Pune, District-Today
24/09/2026 Page No. 6

वनभ्रमंतीतून पर्यावरण संवर्धनाची शिकवण

राजगुरुनगर : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील भूगोल व मराठी विभागाच्या वतीने भोरगिरी ते भीमाशंकर वनसचेतन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. जंगलभ्रमंतीदरम्यान विद्यार्थ्यांनी परिसरातील जैवविविधता, वनसंपदा आणि निसर्गसौंदर्याचा अनुभव घेतला. भूगोल विभागप्रमुख डॉ. दिलीप मुळूक व प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी विद्यार्थ्यांना विविध झाडे, वनस्पती, शेकरू तसेच ब्ल्यू मॉर्मनसह अनेक फुलपाखरांची ओळख करून दिली. या प्रत्यक्ष निरीक्षणातून विद्यार्थ्यांना वनस्पती व प्राणिजीवनातील परस्परसंबंध समजले. भीमाशंकर परिसरात प्लास्टिक कचरा संकलित करणाऱ्या वनविभागातील महिला कर्मचाऱ्यांशी विद्यार्थ्यांनी संवाद साधला. शिबिराचे आयोजन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. दिलीप मुळूक, प्रा. मच्छिंद्र मुळूक आणि प्रा. वैभवी कोपर्डे यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख